# दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिशा... नवे विचार.....**

पुणे/पिंपरी-चिंचवड

रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - १ ■ अंक - ५३ ■ पाने - ४


## सुविचार

“संघर्षाचा रस्ता कठीण असला तरी हार मानू नका; कारण जनतेच्या (किंवा आपल्या) धैर्य, चिकाटी आणि प्रयत्नांमधूनच यशाचा उजाडणारा पहाटकाळ जन्म घेतो.”

## थोडक्यात

### राष्ट्रवादी काँग्रेस बिहारमध्ये पराभूत

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वातील एनडीएला प्रचंड बहुमत मिळाले आहे. या निकालांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणातही जाणवू लागला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बिहारमध्ये स्वबळावर लढण्याचा मोठा फटका बसला आहे. 'एनसीपी'ला बिहारमध्ये एक टक्क्यापेक्षा कमी मते मिळाल्याचे चित्र आहे. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा पुन्हा मिळवण्यासाठी अजित पवार यांनी बिहारमध्ये १५ उमेदवार उतरवले होते. मात्र एकाही जागांवर आघाडी मिळू शकली नाही. त्यातील १३ उमेदवारांना इतकी कमी मते मिळाली आहेत.

---

### अपघात टाळण्यासाठी उपाय योजना

**पुणे :** मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर सतत होणारे अपघात टाळण्यासाठी त्वरित योग्य उपाययोजना करण्यात येणार आहेत. याकरिता राष्ट्रीय महामार्ग प्रशासन, पुणे महापालिका निवडणुकीत प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पीएमआरडीए प्रशासन, पोलिस प्रशासन व सर्व विभागाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित केली आहे.

---

### इंदुरीकर महाराजांना रूपाली ठोंबरे यांची साथ

**पुणे :** साधेपणाने विवाहसोहळे करावेत, असा नेहमी संदेश देणाऱ्या इंदुरीकर महाराजांनी स्वतःच्या मुलीचा साखरपुडा मोठ्या थाटामाटात केला, अशी टीका काही नेटिझन्सनी केली. या टीकेत वैयक्तिक पातळीवरून उलटसुलट बोलणे सुरू झाल्याने इंदुरीकर महाराज मानसिक तणावात असल्याचे दिसून आले. या संपूर्ण घडामोडीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी समर्थनाचा सूर छेडत इंदुरीकर महाराजांना धीर देणारी प्रतिक्रिया दिली आहे.

त्यांनी फेसबुकवर लिहिलेल्या पोस्टमध्ये महाराजांना फेटा खाली ठेवू नका, असा भावनिक संदेश दिला. सोशल मीडियावरील काही विकृत टिप्पणी करणाऱ्यांकडे लक्ष न देता महाराजांनी आपले कार्य सुरू ठेवावे, असे त्यांनी सांगितले.


## फरिदाबादमधून आणलेली स्फोटके निकामी करताना

# पोलीस ठाण्यात स्फोट ; ९ ठार!

## काश्मीरमधील नागौम पोलीस ठाण्यात भयंकर घटना

**श्रीनगर : दिल्लीतील स्फोट प्रकरणात हरियाणा मधील फरिदाबाद येथून जप्त केलेल्या स्फोटकांना निकामी करताना झालेल्या शक्तिशाली स्फोटात ९ पोलीस कर्मचारी जागीच ठार झाले असून २० जण गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना शुक्रवारी उशिरा रात्री घडली.**





सोमवारी १० नोव्हेंबर रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर तपास यंत्रणांनी विविध ठिकाणी छापे मारून जी स्फोटके ताब्यात घेतली ,ती तपस करण्यासाठी काश्मीर मधील नागौम पोलीस ठाण्यात आणण्यात आली होती , काळ पासून त्यातील काही बॉम्ब निकामी करण्याचे प्रयत्न सुरु होते. शुक्रवारी रात्री ही स्फोटके हाताळताना झालेल्या भयंकर स्फोटात पोलीस ठाण्यातील नऊ पोलीस कर्मचारी ठार झाले असून परिसरातील २० लोक गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

हा स्फोट भयंकर होता की स्फोट झाल्यावर त्याचे परिणाम परिसरात ३० किमी पर्यंत जाणवले. परिसरातील अनेक वाहनांना आग लागली. रात्री तात्काळ अग्निशमन दलाच्या गाड्यांची आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला असला तरी तोवर मोठ्या प्रमाणावर जीव आणि वित्तहानी झाल्याचे सूत्रांनी सांगितले. स्फोटाच्या तीव्रतेनेमुळे परिसरातील काही घरांची तावदाने, फुटल्याचे सांगण्यात आले असून या प्रकरणी तपास यंत्रणांनी परिसर ताब्यात घेतला आहे. फॉरेन्सिक चमू,महसूल अधिकारी आणि पोलीस अधिकारी या स्फोटकांची तपासणी करीत असताना हा स्फोट झाल्याने महसूल विभागातील चार कर्मचारी सुद्धा यात ठाकर झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

### उच्चस्तरीय बैठक सुरु

दरम्यान या स्फोटाच्या घटनेनंतर केंद्रीय गृह खात्याने हालचाली सुरु केल्या असून गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक आज बोलावली असून स्फोटाशी संबंधित कोणत्याही घटकाला सोडले जाणार नसल्याचा इशारा आज अमित शाह यांनी दिला आहे.

# काँग्रेसचे लवकरच विभाजन होणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाकीत

**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्षाचा अजेंडा हा मुस्लिम लीग आणि माओवादाभोवती फिरत आहे. त्यामुळे आजची काँग्रेस मुस्लिम लीग,माओवादी काँग्रेस (एमएमएस) बनली आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. वेगळा अजेंडा असलेल्या काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा मोठी फूट पडू शकते, असे भाकीतही त्यांनी केले. बिहार विधानसभा निवडणुकीतील एनडीएच्या ऐतिहासिक विजयानंतर भाजप मुख्यालयामध्ये उपस्थितांना ते संबोधित करत होते. यावेळी त्यांनी काँग्रेस, राजद यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच ऐतिहासिक विजयाबद्दल भाजप आणि एनडीएच्या नेत्यांचे आणि कार्यकत्यांचे अभिनंदन केले. बिहार जिंकल्यानंतर आता प. बंगालही जिंकणार, तेथील जंगलराजही संपविणार, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना इशारा दिला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह वरिष्ठ नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज काँग्रेस मुस्लिम लीग माओवादी काँग्रेस बनली आहे. काँग्रेसचा संपूर्ण अजेंडा आता याचभोवती फिरतो. म्हणूनच काँग्रेसमध्येही एक वेगळा गट उदयास येणार आहे, जो या नकारात्मक राजकारणामुळे



अस्वस्थ आहे. हा गट काँग्रेसच्या नामदारांच्या विरोधात आहे. या गटामध्ये तीव्र निराशा वाढत आहे. भविष्यात काँग्रेसमध्ये आणखी एक मोठी फूट पडू शकते. काँग्रेसच्या मित्रपक्षांनाही आता हे समजत आहे की, काँग्रेस सर्वांना नकारात्मक राजकारणात बुडवत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी काँग्रेसच्या मित्रपक्षांना आधीच सांगितले आहे की, काँग्रेस हा एक परजीवी आहे. जो त्यांच्या मित्रपक्षांची व्होट बँक गिळंकृत करून पुनरागमन करू इच्छितो. म्हणून त्यांनाही काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज आहे. बिहारमध्ये राजद अडचणीत आहे. काँग्रेस-राजद वाद लवकरच समोर येईल, असा दावा त्यांनी केला. बिहारमध्ये जंगलराज आणि बिहारमध्ये जंगलराज आणि कट्टा सरकार पुन्हा येणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. लोकांनी विकसित आणि समृद्ध बिहारसाठी मतदान केले आहे. जामिनावर असलेल्यांना जनता साथ देत नाही, हे बिहारने दाखवून दिल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

### अनाथांना आता रिक्त पदावर आरक्षण

**मुंबई :** महाराष्ट्रातील सरकारी नोकऱ्यांमध्ये अनाथांसाठी असलेले एक टक्का आरक्षण आता 'उपलब्ध पदांऐवजी' 'रिक्त पदांवर' लागू होईल. यासंदर्भात आज सरकारने एक सुधारित शासन निर्णय जारी केला आहे. 'संस्थात्मक अनाथ' याची व्याख्या आता अधिक स्पष्ट करण्यात आली आहे. ज्या मुलांचे जैविक पालक त्यांचे वय १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी वारले आणि ज्यांचे संगोपन फक्त बाल न्याय अधिनियमांतर्गत मान्यताप्राप्त संस्थांमध्ये झाले आहे. राज्यात आता अनाथांना आरक्षण दिव्यांगांच्या आरक्षणाप्रमाणे नव्हे, तर एकूण समांतर आरक्षण पद्धतीने लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आरक्षणातून निवडलेला उमेदवार जर नोकरी स्वीकारण्यास नकार देईल किंवा राजीनामा देईल तर प्रतीक्षा यादीतील ती जागा मिळेल.

## विशेष संपादकीय

### बिहारमध्ये पुन्हा नितीशच का?

**राजकारण** ही नेहमीच सरकत्या गाळासारखी असते, आणि प्रत्येक निवडणूक आपल्यासमोर तीच जुनीच रचना आणते. बिहारचा राजकीय चित्रपटमंच पुन्हा एकदा ‘नितीश-केंद्रित’ रंगभूमीवर उभा आहे, पण सवाल नेहमीचाच आहे. खरा बदल कधी? आजही जनतेच्या मनात हा प्रश्न गंभीरतेने रुजतो. परंतु राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर, सामाजिक विकास आणि लोकमताच्या दृष्टिकोनातून काही महत्वाचे पैलू दुर्लक्षित राहतात. त्यातच महिलांना १० हजार रुपये जमा करून दिलेले निधी, रोजगारविषयक योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, आणि स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेतील सहभाग या सारख्या मोलाच्या विषयांचा समावेश होतो. महिलांना १० हजार रुपये जमा करण्याचा उपक्रम ही केवळ आर्थिक मदत नसून, सशक्तीकरणाचे प्रतीक आहे. पण, आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिणाम यामध्ये तफावत असल्याचे अनेक अभ्यास सूचित करतात. फक्त रक्कम जमा होणे पुरेसे नाही; त्याचा खऱ्या अर्थाने निर्णयक्षमता, आर्थिक स्वावलंबन, आणि सामाजिक सन्मान यावर परिणाम झाला का, हे पाहणे अत्यावश्यक ठरते. अनेक स्त्रियांनी या निधीचा उपयोग वैयक्तिक उत्पन्न वाढवण्यासाठी, व्यवसाय सुरु करण्यासाठी किंवा कुटुंबातील गरजा भागवण्यासाठी केला आहे, तर काहीजण फक्त आकड्यांमध्येच मर्यादित राहिल्या आहेत. त्यामुळे सरकार आणि प्रशासनासाठी ही एक सत्यापनाची कसोटी ठरत आहे

**राजकारणाच्या रंगभूमीवर परत येऊ**

बिहारमध्ये, नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांभोवती घडणारे फेरफार, पक्षांतील गटवाटा, आणि तिकिटांचे खेळ हे नेहमीच जनतेच्या लक्षात येतात. “पुन्हा नितीशच का?” हा प्रश्न फक्त पत्रकारांच्या किंवा सामाजिक विश्लेषकांचा नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचा अनुभव झाला आहे. त्याच्या नेतृत्वाखालील्या सरकारने अनेक सामाजिक व आर्थिक योजनांची अंमलबजावणी केली, पण सर्व स्तरावर समावेश आणि बदलाचे प्रमाण कितपत दिसले, हा विषय नेहमीच चर्चेचा मुद्दा राहतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये हे अधिक स्पष्ट होते. प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपंचायत, आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत, नेता कोणत्या गटाला प्राधान्य देतो, हे ठरवणे महत्त्वाचे ठरते. “हाडाचे कार्यकर्ते” आणि “लाडाचे कार्यकर्ते” यांच्यातील संघर्ष फक्त सत्ता-संबंधित नाही; त्यामागे राजकीय संस्कृती, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता, आणि स्थानिक विकासावर प्रभाव या गोष्टीही आहेत. या संदर्भात महिलांच्या सशक्तीकरणाचे उपाय, आर्थिक मदतीचे वितरण, आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागाची परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. महिलांच्या निधीच्या बाबतीत, काही जिल्ह्यांमध्ये आर्थिक मदतीचा परिणाम दिसून येत आहे. महिलांनी छोट्या उद्योगांना सुरुवात केली, काहीजण शिक्षणासाठी निधीचा उपयोग करत आहेत, तर काहीजण गावच्या स्वयंसेवी कार्यक्रमात सक्रिय झाली आहेत. परंतु काही ठिकाणी निधी फक्त आकडेवारीतच मर्यादित आहे. त्यामुळे सरकारसाठी ही एक शिकवणारी प्रक्रिया आहे—फक्त योजना घोषित करणे पुरेसे नाही; त्याचा प्रत्यक्ष परिणाम कसा होत आहे, याची मोजणी आणि विश्लेषण करणे गरजेचे आहे. राजकारणातील “पुन्हा नितीशच” संदर्भात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की नेत्यांच्या नेतृत्वाखाली होणारा विकास, योजना, आणि सामाजिक सशक्तीकरण यांची जोड स्थानिक लोकसंख्येच्या अपेक्षांशी सुसंगत आहे का, हे तपासणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीत फक्त नेतृत्वाचे नाव पुरेसे नसते; प्रभावी धोरण, कार्यान्वयन आणि सहभागी नागरिक हे सर्व घटक एकत्र येऊन बदल घडवतात. अर्थव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण या विषयांमध्ये मिळणारा परिणामच खऱ्या अर्थाने लोकशाहीची कसोटी ठरतो. नितीशकडे पुन्हा एकदा सत्ता आली तरी, प्रश्न असतो: अस्सल बदल, स्थानिक सहभाग, आणि प्रत्यक्ष परिणाम कधी दिसतील? महिला निधी, आरोग्य योजना, रोजगार उपक्रम, आणि स्वराज्य संस्था निवडणुकीतील सक्रिय सहभाग हे सर्व घटक हेच दाखवतात. विकासाच्या प्रक्रियेत जनतेचा सहभाग कितपत आहे आणि निर्णय कितपत समावेशी आहेत. शेवटी, “पुन्हा नितीशच का?” हा प्रश्न फक्त नावावर थांबत नाही; तो लोकशाहीच्या कार्यप्रणाली, सहभाग, आणि परिणामकारकतेवर प्रश्न उभा करतो. महिलांना दिलेली १० हजार रुपयांची निधी योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग, आणि नेत्यांच्या धोरणांची पारदर्शकता हे सर्व एकत्रित करूनच आपण खऱ्या अर्थाने सशक्त, परिणामकारक, आणि समावेशी लोकशाहीची उभारणी करू शकतो.

**- डॉ. अशोक बालगुडे,** संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे

### बिहारच्या निकालात महिलांच्या मतदानाचा प्रभाव - शरद पवार

**बारामती :** बिहार निवडणुकीत NDA ने ऐतिहासिक विजय मिळवला असून, २०० पेक्षा जास्त जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बारामतीत या निकालावर आपले विचार मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, महिलांच्या मतदानाचा निकालावर मोठा प्रभाव होता. विशेषतः निवडणुकीपूर्वी प्रत्येक महिलेच्या खात्यात १०,००० रुपये जमा केले गेले त्यामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढला आणि निकालावर थेट परिणाम झाला.

शरद पवार म्हणाले, “ही लहान रक्कम नाही. अशा पद्धतीने पैशाचे वाटप करून निवडणुकीत सामोरे जाणे ही लोकांच्या विश्वासाला धक्का देणारी बाब ठरू शकते. निवडणूक आयोगाने याचा सखोल विचार करायला हवा.” त्यांनी महाराष्ट्रातील ‘लाडक्या बहीण’ योजनेचे उदाहरण दिले, जिथे निवडणुकीपूर्वी आर्थिक सहाय्य वितरणामुळे मतदानावर प्रभाव पडला होता. भविष्यात सत्ता हातात असलेल्या नेत्यांनी अशी पद्धत वापरली तर निवडणुकीच्या नैतिकतेवर प्रश्न निर्माण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक पातळीवरील युतीबाबत पवार म्हणाले, “तालुका व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्ष म्हणून जाणे किंवा न जाणे हे स्थानिक परिस्थितीनुसार ठरवले जाईल.

दरम्यान, “निवडणुका स्वच्छ आणि पारदर्शक असायला हव्यात. पैशाचे मोठ्या प्रमाणातील वाटप या नैतिकतेला प्रश्नचिन्हाखाली आणू शकते.” लोकांना आणि निवडणूक आयोगाला इशारा शरद पवार यांनी दिला.

# पराभव बिहारमध्ये मात्र महाराष्ट्राला हादरा; काँग्रेसला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये महाआघाडीचा मोठा पराभव झाला असून, एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळे बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजप ८९, जेडूयूने ८५ जागांवर आघाडी मिळाली आहे. मात्र, काँग्रेस अवघ्या सहा जागांवर समाधान मानावे लागले आहे. बिहारमध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला आहे, बिहारमधील पराभवानंतर काँग्रेसला महाराष्ट्रात देखील मोठा झटका बसल्याने बड्या नेत्यानं काँग्रेसची साथ सोडली आहे.

बिहारच्या निकालानंतर महाराष्ट्रात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे, ठाणे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे यांनी तडकाफडकी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आहे. दयानंद चोरगे हे मागील विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे भिवंडीतील उमेदवार होते. माझ्या वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत असल्याचं दयानंद चोरगे यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे. मात्र, त्यांनी पत्रात जरी असं म्हटलं असलं तरीदेखील ते गेल्या अनेक दिवसांपासून पक्षावर नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक निवडणुकांमध्ये डावलं गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केल्याची माहिती समोर येत आहे. बिहारचा निकाल हाती येताच दयानंद चोरगे यांनी पक्षाचा आणि जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे, ऐन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

- **बिहारामध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला आहे, विधानसभा निवडणुकीमध्ये एनडीएनं बाजी मारली आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार भाजप सर्वात मोठा पक्षत ठरताना दिसत आहे, तर काँग्रेस अवघ्या दोन जागेवर आघाडीवर आहे.**
- **पराभव बिहारमध्ये, पण भूकंप महाराष्ट्रात, काँग्रेसला सर्वात मोठा धक्का, बड्या नेत्याचा तडकाफडकी राजीनामा**

बिहार निवडणुकीमध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला आहे, त्यांना अपेक्षित असं यश मिळालेलं नाहीये. बिहारमधील २४३ एकूण जागांपैकी भाजप ८९, जेडीयू ८५, मित्रपक्ष २५, काँग्रेस ६, मित्रपक्ष ३ तर इतर ७ असे पक्षीय बलाबल आहे. महाआघाडीमध्ये आरजेडी हा मोठा पक्ष ठरला असून, काँग्रेसमुळेच आरजेडीला फटका बसला, अशी चर्चा देखील आता सुरू झाली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला असून, जेडीयू दुसऱ्या क्रमांकावर आहे. जेडयूपेक्षा यावेळी भाजपच्या जागा अधिक असल्यामुळे बिहारचा मुख्यमंत्री आता कोण होणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**टायगर अभी जिंदा है**

बिहारमध्ये मुख्यमंत्री आणि जेडूयूचे अध्यक्ष नितीशकुमार यांची जादू कायम असल्याचे निकालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नितीश यांच्याच निवासस्थानाबाहेर टायगर अभीभी जिंदा असे फलक पोस्टर अतिशय समर्पक भाषेत झळक्याचे पाहायला मिळाले.

# 'या' एका कारणाने एनडीएला मिळाला मोठा विजय

## शरद पवारांनी बिहार निवडणूक निकालाचं केलं विश्लेषण

**बारामती :** महाराष्ट्रात निवडणुकांच्या आधी अधिकृत सरकारच्यावतीने लाडक्या बहीण योजनेचे पैसे वाटले. याच प्रकारे बिहार निवडणुकींचं मतदान महिलांनी हाती घेतलं. निवडणुकी दरम्यान प्रत्येक महिलेच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये पडले, त्याचाच परिणाम बिहार निवडणुकीच्या निकालावर दिसतोय. या निवडणुकीत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवारांनी बिहार निवडणूक निकालावर बारामतीत दिली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार बारामती दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

पवार म्हणाले की, आता प्रश्न असा आहे की इथून पुढच्या निवडणुकीत ज्याच्या हातात सत्ता आहे. त्यांनी मतदानाच्या आधी अशा पद्धतीने पैशाचे वाटप करून निवडणुकीला सामोरे जायचं, ही भूमिका घेतली तर निवडणूक पद्धतीबद्दल लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल, याची चिंता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाचं वाटप करणं योग्य आहे का? याचा विचार जाणकारांनी केला पाहिजे. निवडणूक आयोगाने सुद्धा याचा विचार केला पाहिजे. निवडणुका या स्वच्छ, पारदर्शक पद्धतीने हव्यात. याबाबत कोणाचं दुमत असण्याचं कारण नाही. मात्र, दहा दहा हजार रुपये वाटणं ही काय लहान रक्कम नाही. याचा परिणाम असा होतो की, मी एकेकाळी बारामती बघत होतो. बारामतीचे वैशिष्ट्य असं आहे की, ५० वर्षांपूर्वी नगरपालिकेची निवडणूक आली की, मतदानाच्या आदल्या दिवशी लोक वाट बघायची. कशासाठी वाट बघायचे हे काय सांगायची गोष्ट नाही. ते वाटून झालं की निवडणुकीचा निकाल काय लागलाय हे कळायचं, हे लहान प्रमाणात होतं, असे त्यांनी स्पष्ट केले. देशामध्ये सध्या सर्वच राज्यात ५० टक्के मतदान हे महिलांचं आहे. त्यांना दहा-दहा हजार रुपये देणं आणि त्यानंतर निवडणुकीला सामोरे जाणं, याचा अर्थ या निवडणुका पारदर्शक आणि स्वच्छ वातावरणात होतात का? याबाबत लोकांच्या मनात शंका आहे. याचा विचार निवडणूक आयोगाने केला पाहिजे, असेही शरद पवार म्हणाले आहेत.

**स्थानिक पातळीवर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र?**

कुठे कुठे युती झाली आहे मला माहित नाही, माझ्या पक्षापुरते मी सांगतो की, आमच्यात अशी चर्चा झाली आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्ही पक्ष म्हणून जात नाही. त्या त्या तालुक्यात जिल्ह्यात स्थानिक पदाधिकाऱ्यांनी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा. हा अधिकार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आहे, असे शरद पवार म्हणाले आहेत.


### मुंबईत काँग्रेसचा स्वबळाचा नारा

**मुंबई :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दरम्यान, मुंबईत आज (१५ नोव्हेंबर) काँग्रेस नेत्यांची महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत काँग्रेसने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना याबाबतची माहिती दिली. काँग्रेसच्या या निर्णयावर आता वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. महाविकास आघाडीमधील काँग्रेसच्या मित्रपक्षाने म्हणजेच शिवसेनेने (उबाठा) यावर प्रतिक्रिया दिली आहे.

# विषारी प्रचाराला बिहारचे उत्तर

## बिहार निकालावर फडणवीस यांची प्रतिक्रिया

**मुंबई :** काँग्रेस आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी देशभरात जो विषारी प्रचार सुरू केला आहे, त्याला बिहारच्या जनतेने एनडीला बंपर विजय देऊन चोख उत्तर दिले आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बिहारच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जनतेने साफ नाकारले. काँग्रेस आता असदुद्दीन ओवैसी यांचा पक्ष एमआयएमच्याही खाली गेली आहे. बिहारमध्ये जनतेने एनडीएच्या विकास आणि सकारात्मक राजकारणाला स्वीकारले असून काँग्रेसच्या नकारात्मक आणि विभाजनकारी प्रचाराला सपेशल नाकारले, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बिहार विधानसभा निवडणूक निकालावर आपली प्रतिक्रिया देताना बिहारच्या जनतेने जंगलराज नाकारले असून विकासराज स्वीकारल्याचा दावा केला. ते म्हणाले, या विजयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री नितीश कुमार आणि बिहारमधील महिला मतदारांना आहे. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे महिला मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करून लैंडस्लाईड विजय मिळवून दिला, त्याचप्रमाणे बिहारमध्येही लाडक्या बहिणींनी हे यश मिळवून दिले. बिहारमध्ये मोदीजी आणि नितीश कुमार यांनी केलेल्या विकासकामांवर जनतेने विश्वास ठेवला. या निकालामुळे विकासराज सुरू राहणार असून जंगलराजला जनतेने पूर्णपणे नाकारले आहे, असे शिंदे म्हणाले. बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने मिळविलेला विजय हा ऐतिहासिक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावरील जनतेच्या दृढ विश्वासाचे ते प्रतीक आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

## सारांश वृत्त

### चालू हंगामात उसाला ३५०० रु. दर द्या : स्वाभिमानी शेतकरी संघटना

**दौंड :** राज्यातील साखर कारखान्यांत गळीत हंगाम सुरू झाला असला तरी ऊस दर जाहीर न झाल्याने शेतकरी नाराज आहेत. चालू हंगामात उसाला प्रतिटन ३५०० रुपये दर जाहीर करावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजाभाऊ कदम यांनी पत्रकारांशी बोलताना केली. कदम म्हणाले की, यासाठी लवकरच जनजागृती मेळावे आयोजित करून कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांना निवेदन देण्यात येणार आहे. मागील हंगामातील उसासाठी १०० रुपये प्रति क्विंटल देण्याचीही त्यांनी मागणी केली. दर न दिल्यास शेतकरी ऊस पुरवठा बंद करण्याचा इशाराही त्यांनी दिला. पुणे जिल्ह्यात शेतकऱ्यांना कमी दर मिळत असल्याचे सांगत, दौंड शुगर कारखान्याने मालेगावप्रमाणे योग्य दर द्यावा, अशी त्यांच्या मागणीची पुनरुच्चार केला.

### अतिक्रमणधारकांना पाठीशी घालणारे अधिकारी निलंबित करावेत – साळुंखे

**दौंड :** सरकारी वनजमिनीवरील अतिक्रमणकर्त्यांना संरक्षण देणाऱ्या दौंड वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी राज्य शिवसंग्राम पक्षाचे उपाध्यक्ष वसंतराव साळुंखे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.पाटस (ता. दौंड) येथील गट क्र. ३४८ मधील ३३ एकर २८ गुंठे क्षेत्रावर साईप्रिया शुगर लिमिटेड आणि एमआरएम भीमा शुगर अँण्ड पावर प्रा. लि. यांनी अतिक्रमण केल्याची तक्रार साळुंखे यांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी वरिष्ठ कार्यालयाकडे केली होती. अधिकाऱ्यांना ३० सप्टेंबरपर्यंत कारवाई व अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, कोणतीही कारवाई न केल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला.

### पिंपरीत बिरसा मुंडा जयंती साजरी

**पिंपरी :** क्रांतिवीर आणि थोर समाजसुधारक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे मुख्य प्रशासकीय इमारतीत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
या वेळी बोलताना उप आयुक्त अण्णा बोदडे म्हणाले, "बिरसा मुंडा यांनी स्वातंत्र्यलढा, जल–जंगल संरक्षक चळवळ आणि सामाजिक एकतेसाठी केलेले कार्य भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहे."
याप्रसंगी माजी नगरसदस्या उषा मुंढे, आशा सुपे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आदिवासी सांस्कृतिक मंडळ (पुणे) अध्यक्ष आनंद भवारी, डॉ. संतोष सुपे, अण्णा शेळके, विष्णू गवारी, बाळासाहेब सुपे, सतीश लेंभे, पांडुरंग तळपे, दत्तात्रय कोकाटे, गौरी गोणरे, संगीता दगडे तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# शिक्रापूरात भंगार गोडाऊनला भीषण आग

## शेजारील सी. एस. भुजबळ इंग्लिश मीडियम स्कूलला तातडीने सुट्टी"

शिक्रापूर : मलठण फाटा परिसरातील लखमाराम ऊर्फ किकाराम चौधरी यांच्या भंगार गोडाऊनला अचानक भीषण आग लागली. आगीचे लोळ प्रचंड होते, त्यामुळे शेजारील सी. एस. भुजबळ इंग्लिश मीडियम स्कूलला त्वरित सुट्टी जाहीर करण्यात आली. शाळेने सर्व विद्यार्थ्यांना बसमधून तसेच पालकांना बोलावून सुखरूप घरी पाठवले.



दरम्यान, आगीची माहिती मिळताच शिक्रापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विकास कुंभार, पोलीस हवलदार आत्माराम तळवले, बापू हाडगळे, शरद कारकुड यांसह रांजणगाव औद्योगिक वसाहत अग्निशामक दल आणि पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या अग्निशामक दलाचे इन्चार्ज शुभम चौधरी घटनास्थळी धावले. अग्निशमन दलाच्या जवानांनी चार तासांत आग आटोक्यात आणली. दरम्यान, पाणी कमी पडल्याने पप्पू सासवडे व स्वप्नील करंजे यांनी पाण्याचे टँकर पुरवले. गोडाऊनमधील लाखोंचे भंगार साहित्य जळून खाक झाले. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. अग्निशमन दल केंद्र व्हावे सणसवाडी कोरेगाव-भीमा परिसरात अनेक कंपन्या असून, येथे अद्याप एकही अग्निशामक बंब नाही. नागरिक म्हणतात की, काही वर्षांपासून प्रलंबित असलेला परिसरातील अग्निशामक दल उभा होण्याची चर्चा रंगत आहे, पण अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत.

## इंदापूरमध्ये राष्ट्रवादीकडून भरत शहा नगराध्यक्षपदासाठी रिंगणात

**इंदापूर :** इंदापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी भरत सुरेशदास शहा यांनी शनिवार (दि. १५) रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी (अ.प.) गटाने शहांवर विश्वास ठेवत उमेदवारी जाहीर केली आहे. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर हे सोमवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, नगरसेवक पदासाठी गणेश देवकर, रोहित ढावरे, संतोष ढोले यांनी अर्ज दाखल केले असून, कृष्णा–भीमा विकास आघाडीकडून संतोष ढोले तर राष्ट्रवादी (अजित पवार) गटाकडून शैलेश पवार आणि मयुरी उंबरे यांनीही उमेदवारी अर्ज सादर केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, मुकुंद शहा, राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे आजी-माजी नगरसेवक तसेच भरत (शेठ) शहा यांचे मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुरसुंगी रेल्वे गेट परिसरात बिबट्याचा वावर; नागरिक धास्तावले



**पुणे :** फुरसुंगी (ता. हवेली) रेल्वे गेट परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे स्थानिक नागरिकांनी पाहिले. यामुळे परिसरातील लोकांमध्ये भय आणि तणाव निर्माण झाला असून, नागरिकांनी वनविभागाकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी रिपाइंचे सूरज गायकवाड, अशोक मोरे, प्रा. अरुण झांबरे, संजय सुपेकर यांनी केली आहे.

दिलीप टकले म्हणाले की, जुन्नर आणि आंबेगाव पट्ट्यामध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे मानवी जीवांचा फटका बसत असल्याची नोंद आहे. तसेच शेतकऱ्यांचे पशुधन बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये बळी पडत आहे, ज्यामुळे स्थानिकांचा जीवितमान आणि आर्थिक परिस्थिती धोक्यात आली आहे. बिबट्याचा वावर नागरीवस्तीमध्ये असल्याने ही बाब अत्यंत गंभीर आहे. रात्रीच्या वेळी नागरिक घाबरून घरात राहतात आणि विशेषतः लहान मुलं आणि वृद्ध लोक यांचा मोठा धोका संभवतो. वनविभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. त्यांनी वनविभागाला निवेदनाद्वारे प्राणीच्या सुरक्षित निष्कासनासाठी कारवाई करण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा प्रशासन आणि वनविभागाची ह्या प्रकरणात त्वरित भूमिका अपेक्षित आहे, अन्यथा नागरिकांची सुरक्षितता आणि परिसरातील शांती धोक्यात येऊ शकते, असे लोककल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाभाऊ होले यांनी सांगितले.

# चिमुकल्यांच्या सर्जनशीलतेने खुलला माहोल

## प्रा. कुमदाळे : रायजिंग स्टार'मध्ये बालदिन उत्साहात

**पुणे :** "मुलांनो आणि शिक्षकहो, बालदिन हा फक्त आजचा दिवस नाही, तर आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आपल्याला बालमन टिकवण्याची आठवण देतो," असे सौ. योगेश्वरी कुमदाळे यांनी मनमोहक सुरुवातीस सांगितले.

मांजरी बु., मोरेवस्ती (ता. हवेली) – रायजिंग स्टार स्कूलमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त बालदिन आनंद, हशा आणि सर्जनशीलतेच्या रंगात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या एकांकिका, नाटिका आणि बालगीतांनी वातावरण रंगून गेले. त्यांच्या निरागस अभिनयाने आणि गोड सुरांनी उपस्थितांची मनं जिंकली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. योगेश्वरी कुमदाळे म्हणाल्या, "बालदिन हा फक्त एक दिवस नसून प्रत्येक क्षणी बालमन जपण्याची आठवण आहे. मुलांची स्वप्ने आकाशाला भिडू द्या, त्यांची सर्जनशीलता फुलू द्या, हीच खरी शिक्षणाची दिशा आहे." त्या पुढे म्हणाल्या, "शिक्षक मुलांना फक्त ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देतात. मुलांची उत्सुकता आणि निरागसता हीच शाळेची खरी संपत्ती आहे."

पंडित नेहरूंच्या बालप्रेमाच्या आठवणी उपस्थितांना भावल्या. "मुलांच्या मनातील स्वप्ने म्हणजे राष्ट्राची खरी शक्ती," असे कुमदाळे यांनी सांगितले. बालदिनाचा उत्सव खेळ, गाणे आणि आनंदाच्या झोकात साजरा होताच विद्यार्थ्यांचे हसू आणि उत्साह शाळेच्या वातावरणात दीर्घकाळ घुमत राहिले.

# शिवसेना उबाठा जिल्हा उपप्रमुखपदी होले

## पक्ष बळकटीसाठी सक्रिय भूमिका

**पुणे :** पिसोळी (ता. हवेली) येथील शिवसेना (उबाठा) पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाचा निर्णय घेत जिल्हा उपप्रमुखपदी पिसोळी येथील कानिफनाथ होले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाप्रमुख उल्हास शेवाळे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार ही नियुक्ती जाहीर केली. विधानसभा संपर्कप्रमुख राम कदम आणि राज्य संघटक अतुल नांगरे यांच्या उपस्थितीत होले यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



होले यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "शिवसेना (उबाठा) पक्षाची विचारधारा आणि ध्येयधोरणे घराघरांत आणि तळागाळापर्यंत पोहोचविणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. संघटन मजबुतीकरणावर विशेष भर देत पक्षविस्ताराच्या दिशेने नियोजनबद्ध पद्धतीने काम करणार आहे." स्थानिक नागरिकांच्या नागरी समस्यांवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन त्यांनी योळी दिले.

या नियुक्तीमुळे हवेली तालुक्यात शिवसेना (उबाठा) संघटन अधिक गतिमान होईल, असा विश्वास पक्षातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी होले यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शिरुर तालुका मंडप व्यवसायिकांची अतिवृष्टीग्रस्तांना मदत

## जिल्हाध्यक्ष प्रदीप नेवाळे यांच्या उपस्थितीत मदतीचे वितरण

**शिक्रापूर :** महाराष्ट्रातील अनेक भागांत झालेल्या अतिवृष्टीने हजारो नागरिकांबरोबरच विविध व्यावसायिकांचेही संसार आणि उद्योग उद्ध्वस्त झाले. यात मंडप व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली. अशा कठीण काळात शिरुर तालुका मंडप वेल्फेअर असोसिएशनने पुढाकार घेत मदतीचा हात पुढे केला आहे.

अतिवृष्टीग्रस्त भागातील मंडप बांधवांना पुन्हा उभे राहण्यासाठी सहाय्य मिळावे, यासाठी असोसिएशनने अर्थसहाय्याचा निर्णय घेत केला.

या उपक्रमांतर्गत शिरुर तालुका मंडप वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने ३० हजार रुपयांचा धनादेश पुणे जिल्हा मंडप वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रदीप नेवाळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. हे पैसे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या मंडप साहित्याची खरेदी आणि व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत. नैसर्गिक संकटाच्या वेळी बांधवांना साथ देण्याची ही कृती सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे.



यावेळी राज्य प्रतिनिधी नंदकिशोर तोवर, जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ टाव्हरे, सल्लागार गोरक्ष काळे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, उपाध्यक्ष लक्ष्मण पऱ्हाड, खजिनदार मच्छिंद्र सुपेकर, संचालक चंद्रकांत शिंदे, दिपक काळे, संजय क्षीरसागर यांसह पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी या मदतकार्याला पुढील काळातही विस्तार देण्याची भूमिका व्यक्त केली. शिरुर तालुका मंडप वेल्फेअर असोसिएशनने केलेल्या या मदतकार्यामुळे अतिवृष्टीग्रस्त मंडप व्यवसायिकांना दिलासा मिळणार असून संकटातील सहकार्याचे हे उदाहरण इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# बापरे... नातेवाईकच निघाले महाठग!

**पुणे :** कात्रज परिसरातील ३१ वर्षीय ऋषिकेश थोरात याच्यावर नातेवाईकांनीच जबरदस्त फसवणूक केली. विवाहाचे आमिष दाखवून शोरूम उघडण्यासाठी पैसे घेतले आणि नंतर अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तब्बल ३८ लाख रुपये घेतले.



लग्नाच्या जाळ्यात ओढून धमकीतून ३८ लाखांची फसवणूक"

याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार कैलास रामचंद्र माने, त्यांची पत्नी आणि दोन मुली यांच्यावर भारती विद्यापीठ पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एप्रिल २०२४ मध्ये ऋषिकेश यांनी क्रेटा कार घेतल्यानंतर त्यांची आई कारचे फोटो व्हॉट्सअॅप स्टेटसवर टाकली.

हे पाहून माने कुटुंबीय थोरात कुटुंबाशी संपर्कात आले आणि शोरूम भागीदारीसाठी पैसे मागितले. वेळोवेळी शोरूम डिपॉझिट, कागदपत्रे, कर्मचारी पगार अशा नावाखाली ३७ लाख ६५ हजार रुपये घेतले, परंतु प्रत्यक्षात कोणतेही शोरूम अस्तित्वात नव्हते, कोणतीही गाडी किंवा माल खरेदी झालेला नव्हता. २ ऑगस्ट २०२५ रोजी ऋषिकेश थायलंडमध्ये असताना माने घरात घुसले आणि कपाटातील ५० हजार रुपये चोरी केले. त्यानंतर त्यांच्या मुलीने व्हिडिओ कॉलवर धमकी दिली, "तुझा अश्लील व्हिडीओ आमच्याकडे आहे, पैसे दिले नाहीस तर व्हायरल करू." भीतीने ऋषिकेशाने ७२ हजार रुपये जीपेवर पाठवले. त्यानंतर माने कुटुंबीयांनी पोलिसांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. सहायक पोलीस निरीक्षक थोरात सध्या तपास करत आहेत.

# पुणे पालिकेकडून थकबाकीदारांना मिळणार ७५% व्याजमाफी!

**पुणे :** महापालिकेच्या मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी महत्त्वाची योजना आजपासून सुरु होत आहे. अभय योजनेत निवासी आणि व्यावसायिक मिळकतींवर आकारलेल्या व्याजावर ७५ टक्के सवलत दिली जाणार आहे. मात्र, २०१६ नंतर अभय योजनेचा लाभ घेतलेल्या १ लाख ४० हजार थकबाकीदारांना या योजनेतून वगळण्यात आले आहे.

त्यामुळे सुमारे चार लाख ९७ हजार १७२ थकबाकीदारांनाच हा लाभ मिळणार आहे. पालिकेने सुरू केलेली ही योजना १५ जानेवारीपर्यंत चालेल. थकबाकीदार महापालिकेच्या संकेतस्थळावर किंवा कर संकलन केंद्रात जाऊन आपली थकबाकी भरू शकतात. महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडे सध्या सुमारे १४ लाख मिळकती नोंदणीत आहेत, त्यातील ६ लाख ३८ हजार थकबाकीदारांची एकूण थकबाकी १२,१६१ कोटी रुपये आहे. यातील मूळ थकबाकी ३,१५८ कोटी रुपये असून, दंड तब्बल ९,००२ कोटी रुपये आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी थकबाकीदार ऑनलाइन आपले बिल पाहून थकबाकी आणि माफ केलेले व्याज भरू शकतात. महापालिकेच्या संकेतस्थळावर बिलात मूळ थकबाकी, व्याज आणि सवलत याची माहिती स्पष्टपणे दिलेली आहे.

तसेच, कर भरणा केंद्रातूनही ही माहिती घेता येते.

महापालिका प्रशासनाने सांगितले की, थकबाकीदारांना याबाबत एसएमएसद्वारे सूचित केले गेले असून, ज्यांना सवलत मिळणार आहे आणि ज्यांना नाही, त्यांनाही वेगळ्या मेसेजद्वारे कळवण्यात आले आहे. या योजनेमुळे महापालिकेला थकबाकी वसुलीला चालना मिळेल, तर थकबाकीदारांना मोठी सवलत मिळेल, असा दोन्हींकडून फायदा अपेक्षित आहे.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलची मुलं अॅक्रोबॅटीक स्पर्धेत चॅम्पियन!

## विजयामुळे संघाची निवड; नागपूरमधील राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**पिंपरी : पुणे विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चमक दाखवत अॅक्रोबॅटीक स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला. आदित्य खाडे, अनय पवार, राजवीर अजूरे आणि पवन खैरवार यांनी संघाचे नेतृत्व केले. या विजयामुळे संघाची निवड नागपूरमधील राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे.**



पुण्यातील कर्वेनगर येथे झालेल्या स्पर्धेत पिंपरी चिंचवड, पुणे महानगरपालिका, पुणे ग्रामीण, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर ग्रामीण, अहिल्यानगर महानगरपालिका आणि अहिल्यानगर ग्रामीण येथील अनेक शालेय संघांनी सहभाग घेतला. एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे विद्यार्थीही कमालीचे प्रदर्शन करत गेले. मुली ट्रायो गटात आर्या थोरात, वैदेही निकम आणि वीरा काटकर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. मिश्र जोडीत ओम पाटील आणि सावनी बडवे तर मुलांच्या जोडीत अमित कोडगाणुरा आणि रुद्र जंगलीवाड यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्य पद्मावती बंडा आणि क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या या यशाने शालेय क्रीडाजगतात आपली खास ओळख निर्माण केली असून, नागपूरच्या राज्यस्तरीय स्पर्धेत या मुलांच्या चमकदार कामगिरीची उत्सुकता सर्वत्र आहे.

# तळेगाव ढमढेरेमध्ये शेतकऱ्यांच्या कंपनीत चोरी

**शिक्रापूर :** येथे शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या ऍग्रो प्रोड्युसर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत सीसीटीव्ही संच आणि कपाटातील३३ हजार रोख रकमेवर चोरट्यांनी डल्ला मारला. याप्रकरणी गोपाळ पंढरीनाथ भुजबळ (वय ४१, रा. माळवाडी, तळेगाव ढमढेरे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले की, दि. १२ नोव्हेंबर रोजी कंपनी बंद करून संचालक जब्बार इनामदार घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी कामगार कंपनीत आले असता ऑफिसच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळले.



सीसीटीव्ही आणि रोख रक्कम लंपास

कंपनीतील कपाट उघडे, कागदपत्रे विस्कळीत पडलेली होती.

चोरट्यांनी कंपनीच्या पाठीमागील पत्र्याचे स्क्रू उचकटून आत प्रवेश केल्याचे निदर्शना आले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार पुढील तपास पोलीस हवलदार किशोर तेलंग करत आहेत.

## सारांश वृत्त

### शिक्रापूरच्या वाचनालयात बालदिन उत्साहात साजरा

**शिक्रापूर :** येथील शासनमान्य भैरवनाथ मोफत वाचनालय येथे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू जयंती व बालदिन साजरा करण्यात आला. यावेळी बालकांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरू जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच रमेश गडदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी नंदकुमार वैद्य, आदर्श शिक्षक चेतन कुर्हेवार, आदर्श ग्रंथपाल संतोष काळे, बबनराव मांढरे, प्रशांत वाबळे, अरविंद गरुड, बापू भुजबळ, पूनम जगदाळे, गणेश जगदाळे, अनंता दरवडे उपस्थित होते. ग्रंथपाल संतोष काळे यांनी आभार मानले.

### रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन साजरा

**बनकरफाटा :** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस "बालदिन "म्हणून ओतूरमधील रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कुलमध्ये विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गाणी, कविता, भाषण, खेळ सादर केले. याप्रसंगी रॉयल एजुकेशन इंग्लिश स्कूल विश्वस्त डॉ. चंद्रशेखर वल्हवणकर, आत्माराम जगताप, वसंत तांबे, रामदास तांबे, मुख्याध्यापिका सुजाता कासार, प्रभारी मुख्याध्यापिका प्रिया भोर, शाळा समन्वयक परिघा कदम, प्रिया भोर, स्वप्नाली औटी, हिना इनामदार, अश्विनी शिंगोटे, राणी सातपुते, शमा तांबोळी, आरती देशमुख, सोनिया शिंगोटे, नम्रता कुलकर्णी, शीतल नलावडे, प्रांजली शेटे उपस्थित होते.

### बालदिन उत्साहात साजरा

**बनकरफाटा :** ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान आणि नवभारताचे निर्माता पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक राजश्री भालेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### यवत पोलिसांची धाडसी कारवाई; सराईत गुन्हेगारांना फिल्मी स्टाईलने पकडले

**दौंड :** पाटस गावातील यात्रेच्या पार्श्वभूमीवर यवत पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री कुसेगाव येथे फिल्मी स्टाईलने धाडसी कारवाई करत चार सराईत गुन्हेगारांना अटक केली. पोलिसांनी संशयित चारचाकीचा पाठलाग करत पाटस–सुपा रस्त्यावर गाडी पलटी अवस्थेत सापडल्यावर आरोपींना वेढा घालून पकडले. गाडीतून दोन लोखंडी कोयते व लाकडी दांडके जप्त करण्यात आले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यवत पोलीस स्टेशनचे पोलीस तपास करीत आहेत.

# अलंकापुरीत कार्तिकी एकादशीचा जल्लोष!

## लाखो भाविकांची गर्दी उद्या माऊलींचा वैभवी रथोत्सव; पांडुरंगाच्या पादुकांचे इंद्रायणी घाटावर स्नान

**आळंदी : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७३० व्या संजीवन समाधी दिनानिमित्त अलंकापुरी आज भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे. शनिवारी (दि. १५) कार्तिकी एकादशीचा उत्सव लाखो वारकरी, वैष्णव भाविकांच्या उपस्थितीत हरिनामाच्या निनादात साजरा होत असून, उद्या (दि. १६) श्रींचा वैभवी रथोत्सव पार पाडला जाणार आहे. राज्यभरातून आलेल्या दिंड्यांनी शुक्रवारपासून (दि. १४) नगरप्रदक्षिणा, पादुकांचे स्नान आणि विविध धार्मिक उपक्रमांनी आळंदीचा परिसर पवित्रतेने उजळून निघाला.**



शुक्रवारी पांडुरंगरायांच्या पादुकांचे इंद्रायणी नदीत वैभवी स्नान हरिनामाच्या गजरात संपन्न झाले. टाळ, मृदुंग, विना यांच्या निनादात शेकडो दिंड्यांनी नगरप्रदक्षिणा पूर्ण केली. यामुळे संपूर्ण नदीकाठ भाविकांच्या गर्दीने भरून गेला होता. आळंदी यात्रेत व्यापारी, पूजेचे साहित्य विक्रेते, संत साहित्य, तुळशी माळा यांची दुकाने गजबजून गेली असून शहराला यात्रेचे स्वरूप लाभले आहे.

यावर्षी नगरपरिषद व देवस्थानच्या नियोजनामुळे वाहतूक, दर्शन व स्वच्छता यांत भाविकांना मोठी गैरसोय झाली नाही. फुटपाथ मोकळे ठेवून वाहतूक फुलप्रूफ करण्यात आली आहे. मंदिरात पहाटेपासून पवमान अभिषेक, दुधारती, महानवैद्य, दिंडींची प्रदक्षिणा, कीर्तन आणि प्रवचनांनी भक्तिभाव ओसंडून वाहत आहे. ह.भ.प. गगुकाका शिरवळकर, ह.भ.प. धोंडोपंतदादा अत्रे, ह.भ.प. वासकर महाराज, ह.भ.प. वाल्हेकर महाराज यांची कीर्तन सेवा आकर्षण ठरली.

आळंदी देवस्थानचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले की, भाविकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, दर्शनबारी, हरिनाम सप्ताहातील कार्यक्रम, वैद्यकीय सुविधा या सर्व सेवा युद्धपातळीवर सुरू आहेत. यंदा मंदिर परिसर, इंद्रायणी घाट, नागापूरकर मंडप, सिद्धेश्वर मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली असून ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

भाविकांच्या सुरक्षेसाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी यात्रास्थळी अधिकारी-कर्मचारी सतत पाहणी करत असल्याचे सांगितले. सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, नियंत्रण कक्ष यांच्या माध्यमातून सुरक्षा कडक करण्यात आली आहे. आरोग्य विभागाने रुग्णवाहिका, प्राथमिक उपचार केंद्रे तैनात करून तयारी पूर्ण केली आहे. दर्शनासाठी यंदा नदीपलीकडेही मोठी बारी गेली असून तीन तासांपर्यंतची प्रतीक्षा वेळ नोंदवली गेली. हजारो भाविकांनी महापूजा अर्पण केली. मेटल डिटेक्टरमधून भाविकांची तपासणी करूनच मंदिरात प्रवेश दिला जात आहे.

कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विविध खात्यांमध्ये समन्वय साधून नियोजन राबवले आहे. जिल्हाधिकारी नियंत्रणाखाली प्रांताधिकारी, तहसीलदार, नगरपरिषद, महसूल अधिकारी, वीज वितरण, आरोग्य विभाग, देवस्थान समिती यांनी एकात्मिकरीत्या यात्रा व्यवस्थापन सांभाळले आहे. पाण्याचा पुरवठा विस्कळीत होऊ नये म्हणून महावितरणसोबत समन्वय करून उपाययोजना करण्यात आल्या. टँकरद्वारेही पाणी उपलब्ध करून दिले गेले.

आळंदीतील कार्तिकी एकादशी निमित्त शाळा मैदान, नदीकाठच्या मोकळ्या जागांवर भाविकांनी राहुट्या उभारून निवासाची व्यवस्था केली आहे. यंदाही १५१ वर्षे जुना, सिसम लाकडाचा, श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी निर्माण केलेला २३ फूट उंच वैभवी रथ यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. रथोत्सवासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

### आळंदी देवस्थान भाविकांच्या स्वागतास सज्ज

भाविकांच्या सेवेसाठी आर्ट ऑफ लिव्हिंग, सेवा मंडळ, विविध धार्मिक संस्था, सामाजिक संघटना सतत स्वयंसेवा देत आहेत. मंदिरात प्रसाद वाटप, औषध वितरण, माळांचे स्टॉल, संत साहित्याची दुकाने यात्रेचा माहोल अधिकच भक्तिमय करत आहेत.

शनिवारी दिवसभर एकादशी उत्सव साजरा होणार असून, रविवारी द्वादशीला वैभवी रथोत्सवाने कार्तिकी यात्रा अविस्मरणीय ठरणार आहे. आळंदी देवस्थान भाविकांच्या स्वागतास संपूर्ण सज्ज असल्याचे विश्वस्त योगी निरंजननाथजी व व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले.

# शिक्षक बालपणातील खरे सुपरहिरो : सूर्यवंशी

## बालदिन उत्साहात; चाचा नेहरूंच्या आठवणींना उजाळा

**पुणे :** "शिक्षक म्हणजे केवळ विषय शिकवणारे नसून जीवनाचे मार्गदर्शक, मित्र आणि बालपणातील खरे सुपरहिरो आहेत. बालदिनाच्या निमित्ताने आज आपण खेळू, आनंद साजरा करू; पण आपल्या शिक्षकांना एक स्मितहास्य आणि 'धन्यवाद' देणेही तितकेच गरजेचे आहे," असे मनोगत मुख्याध्यापक दत्तात्रय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

पेठ (ता. हवेली) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात मुख्याध्यापक सूर्यवंशी आणि अध्यक्ष आदर्श कदम यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.




यावेळी शिक्षिका सीमा रावळ, वैशाली आठवले, आरिफा शेख यांसह शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी चाचा नेहरू यांच्या कार्याचा गौरव करत बालदिनाचे महत्त्व सांगणारे विचार मांडले.

कार्यक्रमानिमित्त तीन पायांची शर्यत, बेडूक उडी, फुगे फोडणे, बादलीत चेंडू फेकणे अशा अनेक खेळांचे आयोजन करण्यात आले. मुलांच्या किलबिलाटाने शाळा परिसर दणकून गेला आणि बालदिनाचा आनंद द्विगुणित झाला. राजेंद्र कुंभारकर यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य सूत्रसंचालन केले.

# आरोग्य शिबिराला ७०० हून अधिक नागरिकांचा प्रतिसाद : स्मिता गायकवाड

## समर्थ युवा फाउंडेशन आणि स्मितसेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीर

**पुणे :** हडपसरमध्ये आरोग्य, आयुष्मान भारत, आधार कार्ड बनवून देण्यासाठी आयोजित शिबिरामध्ये ७००हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप, समर्थ युवा फाउंडेशन आणि स्मितसेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ससाणेनगर, लोखंडी पूल, लक्ष्मी कॉलनी व काळेपडळ येथे शिबिराचे आयोजन केले होते, अशी माहिती स्मिता गायकवाड यांनी दिली. याप्रसंगी माजी नगरसेवक मारुती तुपे, नगरसेविका उज्वलाताई जंगले, योगेश ससाणे, रिपाइं प्रदेशाध्यक्षा शशिकला वाघमारे, भाजप शहर उपाध्यक्ष संदीप दळवी, हडपसर विधानसभा अध्यक्ष आकाश डांगमाळी आदी उपस्थित होते.



यावेळी नेत्र तपासणी, दात, साखर, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी करण्यात आली. तसेच, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, आधार अपडेट, तसेच संजय गांधी, श्रावणबाळ व उत्पन्न दाखला नोंदणी करून घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

समर्थ युवा फाउंडेशनच्या माध्यमातून शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. घनवट, शुभम गाडेकर, दिपक दाहिगुडे, स्मिता नांगरे व स्वयंसेवकांनी विशेष सहकार्य केले. स्मिता गायकवाड म्हणाल्याकी , "शासनाच्या आरोग्य व सामाजिक सेवांचा लाभ लोकांपर्यंत सहज पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. नागरिकांचा प्रतिसाद प्रेरणादायी आहे," असे त्यांनी सांगितले.

# नोंदणी विभागाचा घातक निर्णय

## काही दस्तऐवजांची नोंदणी पूर्ण बंद!"

**पुणे :** मुंढवा आणि ताथवडे परिसरातील शासकीय जमिनींच्या संशयास्पद खरेदी-विक्री व्यवहारांमुळे आता नोंदणी व मुद्रांक विभागाने मोठे आणि कठोर पाऊल उचलले आहे. अनेक गडबडी समोर आल्यानंतर विभागाने काही विशिष्ट प्रकारच्या दस्तऐवजांची नोंदणी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सरकारी मालमत्तेच्या बेकायदेशीर हस्तांतरणावर मोठ्या प्रमाणात आळा बसणार असल्याचे बोलले जात आहे.

सह जिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी सर्व दुय्यम निबंधकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी करण्यापूर्वी संबंधित मालमत्तेचा सातबारा उतारा आणि प्रॉपर्टी कार्डवरील सर्व शेरे अत्यंत काळजीपूर्वक तपासावेत. विशेषतः, त्या



दस्तऐवजात नमूद व्यवहार कोणत्याही अधिनियमाचे उल्लंघन करत नाहीत याची खात्री करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

जर दस्तऐवजात किंवा शेऱ्यांमध्ये कोणतेही प्रतिबंधात्मक अटी, सरकारी मालकीचे संकेत किंवा मनाईशी संबंधित माहिती आढळली तर संबंधित शासकीय प्राधिकरणाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' (NOC) घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. NOC नसल्यास नोंदणी मंजूर न करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

नव्या 'नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०२३' नुसार काही दस्तऐवजांची नोंदणी आता पूर्णतः प्रतिबंधित आहे. त्यात

**खालील दस्तऐवजांचा समावेश:**

केंद्र किंवा राज्य सरकार किंवा त्यांच्या अधीनस्थ प्राधिकरणाची मालकी असलेल्या स्थावर मालमत्तेशी संबंधित दस्तऐवज न्यायालयाने जप्त केलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचे व्यवहार कायद्यानुसार मनाई असलेल्या कोणत्याही प्रकारचे व्यवहार किंवा हस्तांतरण विशेष निर्देशांनुसार ताथवडे (ता. मुळशी) येथील सर्व्हे क्र. 20 या मिळकतीवरील सर्व प्रकारचे दस्तऐवज महसूल किंवा पशुसंवर्धन विभागाच्या स्पष्ट परवानगीशिवाय नोंदणीस पात्र राहणार नाहीत.

# विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दिली शाळांमध्येच आधार सेवा : देवकर




**पुणे :** "शैक्षणिक योजनांपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, म्हणून आधार अद्ययावत सेवा थेट शाळेमध्ये सुरू केल्याचे माजी नगरसेविका मोहिनी देवकर यांनी सांगितले. जागतिक बालदिनानिमित्त डाक विभागाच्या सहकार्याने बाल विकास मंदिर, पुणे कॅम्ब्रिज पब्लिक स्कूल, शाळा क्र. १६२, थोरवे माध्यमिक विद्यालय आणि शाळा क्र. १९ विद्यानिकेतन या शाळांमध्ये बायोमेट्रिक आधार अद्ययावत सेवा उपलब्ध करून देण्यात आली. याप्रसंगी माजी नगरसेविका वर्षा तापकीर, अरुण राजवाडे, महेश भोसले, सचिन बदक तसेच शिक्षकवर्ग, पालक आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांची कागदपत्रे अपूर्ण असल्याने शिष्यवृत्ती, शैक्षणिक योजनांचा लाभ आणि प्रशासकीय प्रक्रिया सुरळीत पार न पडण्याची समस्या जाणवत होती.

# तिकिट कुणाला? हाडाच्या की लाडाच्या कार्यकर्त्यांना!

**रांजणी (रमेश जाधव) मंचर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर "तिकीट कुणाला—हाडाच्या कार्यकर्त्यांना की नेत्यांच्या लाडक्या कार्यकर्त्यांना?" या चर्चेने संपूर्ण शहरात राजकीय तापमान चढले आहे. आंबेगाव तालुक्याची राजकीय राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंचर शहरात प्रथमच नगरपंचायत निवडणूक होत असल्याने या निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणुकीची तारीख जाहीर होताच सर्वच पक्षांच्या इच्छुकांनी 'गुडघ्याला बाशिंग' बांधत मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पण सर्वात मोठा प्रश्न कायम—तिकीट कुणाला? हाडाच्या कार्यकर्त्यांना का लाडाच्या?**

**राजकीय वातावरण तापले**

निवडणुकीची चाहूल लागताच मंचर शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. गल्ली–बोळात एकच चर्चा—तिकीट मिळणार कोणाला? हाडाचे कार्यकर्ते म्हणजे वर्षानुवर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे झटणारे, प्रचार ते संघटन अशा सर्व स्तरांवर सक्रिय असणारे चेहरे. तर 'लाडाचे कार्यकर्ते' म्हणजे नेतृत्वाच्या जवळचे, "खास माणसं" म्हणून ओळखले जाणारे आणि निवडणुकीच्या वेळी प्रभाव दाखवणारे कार्यकर्ते. या दोन गटांमधील शीतयुद्ध आता शहरात उघडपणे दिसू लागले आहे.

### मंचर नगरपंचायत निवडणुकीचा राजकीय आखाडा सज्ज

**इच्छुकांची धावपळ**

विविध पक्षांचे उमेदवार तिकीट मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी घेत आहेत. सोशल मीडियावर पोस्टरबाजी, स्वतःची उपस्थिती दाखवण्याचे प्रयत्न, तर दुसरीकडे कार्यकर्त्यांसोबत बैठकांचे सत्र—अशी धावपळ जोरात सुरू आहे. मात्र अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडेच असल्याने सर्वांची उमेदवारी सध्या 'गुलदस्त्यात' आहे.

**राजकीय समीकरणे गुंतागुंतीची**

मंचरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (एकनाथ शिंदे गट), काँग्रेस आणि भाजप असे सर्वच पक्ष रणसज्ज झाल्याचे चित्र आहे. नुकत्याच खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दोन्ही राष्ट्रवादी गट जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका एकत्र लढवतील असे सांगितल्याने स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे मंचर नगरपंचायत लढतीत राष्ट्रवादीचे दोन्ही गट विरुद्ध उबाठा शिवसेना आणि भाजप असा बहुकोनी संघर्ष रंगण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शहरात राजकारणाला ताप**

मंचरमध्ये सध्या गुप्त बैठका, सोशल मीडिया मोहीम, रणनीती आखणी आणि अंतर्गत गोटबाजी यामुळे निवडणुकीचे वातावरण रंगात आले आहे. हाडाचे–लाडाचे कार्यकर्ते हा वाद आता प्रत्येक पक्षात कळीचा मुद्दा बनला असून तिकिट वाटपाच्या दिशेने सर्वांचे लक्ष लागले आहे.

# "पीएमपी बस की चालकांचा दादागिरी-रथ?"

## रोहन सुरवसे पाटील : जबाबदारी झटकणाऱ्यांना लगाम कधी?

**पुणे : शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी 'सार्वजनिक वाहतूक वापरा' हा संदेश देणारे प्रशासन प्रत्यक्षात पीएमपी बसमधील चालक-वाहकांच्या दादागिरीकडेच डोळेझाक करत असल्याचे चित्र दिवसेंदिवस स्पष्ट होत आहे. "ही बस प्रवाशांसाठी सुरू आहे की काही कर्मचाऱ्यांच्या मनमर्जीचा मदार आहे?" असा संतप्त प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहन सुरवसे-पाटील यांनी उपस्थित केला.**




सुरवसे-पाटील म्हणाले की, प्रवाशांनी सांगितले की, अनेक चालक सिग्नलला वेळ असतानाही दरवाजे उघडत नाहीत. सूचना दिल्यास सरळ "सहन होत नसेल तर स्वतःची कार घ्या" अशी धमकीवजा प्रतिक्रिया देतात. काही चालक प्रवाशांनी शब्द काढताच बस बंद करून "मग तुम्हीच चालवा" असा नंग्या ढंगात पवित्रा घेतात. पीएमपीच्या 'सुरक्षित व सुयोग्य प्रवास' या दाव्याला छेद देणाऱ्या या घटना अधेमधे नव्हे तर दिवसेंदिवस वाढत असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. बसमध्ये चढण्यापासून प्रवास संपेपर्यंत प्रवाशांच्या तक्रारींचा सुर एकच—उद्धट वर्तन, सततचा हॉर्न, नियमांचे उल्लंघन आणि तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात आहे. शेवाळेवाडी पीएमपी आगारात तक्रार केली असता "ही बस ठेकेदाराची; चालक आमचे नाहीत" अशी सरळ पळवाट काढली जाते. तर ई-बसचे प्रशासकीय अधिकारी राजेश जाधव तक्रारीवर "व्हिडिओ काढलात का? बीआरटीमध्ये वाहने असतात म्हणून हॉर्न वाजवतो; तुम्हीच आवाज उठवा" असे म्हणत जबाबदारी झटकून मोकळे होतात, असे त्यांनी सांगितले.

बसमध्ये सस्पेंशन नसल्याने पाठदुखीचा त्रास वाढतो; स्पंज नसलेली सीट प्रवास अधिक त्रासदायक बनवते. अचानक ब्रेक मारल्यानंतर उभे प्रवासी थेट पुढच्या दरवाजापर्यंत ढकलले जातात. गर्दी, धक्काबुक्की, संताप ही रोजची कहाणी आहे. "पीएमपी बस प्रवाशांसाठी आहे हे काही चालक-वाहकांना पूर्णतः विसरलेले दिसते." प्रवाशांचा आरोप—चुकी चालकाची, पण ढिलाई प्रशासनाची; दोघांचेही पैसे मात्र आमचे आहेत, याचे भान अधिकाऱ्यांना राहिले नाही.

> अनावश्यक हॉर्नच्या आवाजाने एका दुचाकीस्वाराचे लक्ष विचलित झाले आणि तो घसरून जागीच मृत्यूमुखी पडला. "ही फक्त बेफिकीरपणाची घटना नसून, वर्षानुवर्षे दुर्लक्षित केलेल्या हॉर्न-दहशतीची थेट किंमत आहे."
>
> **-ॲड. अमोल कापरे,** भेकराईनगर

> पीएमपी प्रशासनाने शहर-उपनगर आणि ग्रामीण भागात "बस जाळे वाढवणं पुरेसं नाही; प्रवाशांचा सन्मान आणि सुरक्षितता राखणं ही मूलभूत जबाबदारी आहे. दादागिरी करणाऱ्यांवर तातडीने कारवाई केली पाहिजे."
>
> **-ॲड. व्ही. व्ही बोरकर,** हडपसर

> पुणेकरांचा सूर आता स्पष्ट आणि तिखट आहे. 'बस आमच्या करांच्या पैशातून चालते; दादागिरी आम्ही का सहन करावी?' प्रवाशांची मागणी एकच आहे आडमुठ्या चालकांना आळा, आणि निष्क्रिय प्रशासनास जाग आली पाहिजे.
>
> **-- शिवाजी पवार,** माजी नगरसेवक, हडपसर

हडपसर, भेकराईनगर, शेवाळेवाडी या मार्गांवरील प्रवाशांची स्थिती तर अधिकच बिकट. "दोन तासांचा प्रवास म्हणजे बस नव्हे, रोजची शिक्षा," असे शिरीष रणदिवे, राजेंद्र राऊत, कल्पना हांडे यांनी सांगितले.

दैनिक राज्य लोकतंत्र



## थोडक्यात

### इन्स्टागँग'कडून ८ घरफोड्यावरून भांडाफोड

**पुणे :** इन्स्टाग्रमवरून झालेल्या ओळखीने सुरू झालेला संवाद पुढे गाढ मैत्रीत बदलला आणि अखेर नशेच्या व्यसनासाठी पैसे मिळवण्याच्या अंधाधुंद हव्यासातून काही तरुणांनी स्वतःची एक गुन्हेगारी टोळी तयार केली. या 'इन्स्टागँग'ने दिवाळीच्या सुट्टीचा फायदा घेत शहरातील रिकाम्या घरांवर पाळत ठेवत तब्बल आठ चोऱ्या केल्याचे उघड झाले आहे.

या टोळीत एका विधिसंघर्षित बालकाचा समावेश असून, त्याच्या नावावर आधीच नऊ गुन्हे नोंदलेले आहेत. विमानतळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेने या टोळीवर कारवाई करून अंदाजे १४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला.

या टोळीचा लीडर नवनाथ उर्फ लखन बाळू मोहिते (वय २२, वैदुवाडी, हडपसर) हा असून, हडपसर पोलीस ठाण्यात त्याच्यावर अमली पदार्थांचा साठा आणि विक्रीचा गंभीर गुन्हा आधीच दाखल आहे. त्याच्यासोबत शिवम दत्ता अवचर (वय १९, नऱ्हे) आणि एक अल्पवयीन मुलगा मिळून तिघांनी गुन्हेगारीची सांगड घातली. इंस्टाग्रामवरून एकमेकांना भेटलेल्या या तरुणांनी व्यसनाचा खर्च भागवण्यासाठी घरफोड्या करण्याचा मार्ग पत्करला.

### अजित पवार यांच्या कारवाईनंतर ठाकरे, शिंदेंकडून ऑफर

**पुणे :** राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या दोन रूपालींमधील वाद चव्हाट्यावर आला. रूपाली ठोंबरे यांनी चाकणकरांविरोधात सातत्याने टीकेची झोड उठवली. या प्रकरणाची दखल घेत पक्षाने कारवाई करत ठोंबरेंचे प्रवक्ते पदही काढून घेतले.

यानंतर रूपाली ठोंबरे यांनी पत्रकार परिषद घेत आपली बाजू मांडली. यादरम्यान शिंदेंची शिवसेना व ठाकरे गटाकडून ऑफर आल्याचे ठोंबरेंनी सांगितले. येणारी महापालिकेची निवडणूक लढणार, असे ठोंबरेंनी ठामपणे सांगितले.

# नवले ब्रीजवरील अपघात रोखायचे कसे ?

## मुरलीधर मोहोळांची तातडीची बैठक, अवजड वाहनांबाबत सर्वात मोठा निर्णय

**पुणे :** कात्रजचा नवा बोगदा (जांभूळवाडी) ते नवले उड्डाणपूल या दरम्यानचे अपघात कमी करण्यासाठी तातडीच्या, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येथील वेगमर्यादा ६० वरुन ३० किमी प्रतितास करणार, अशी घोषणा केंद्रीय हवाई उड्डाण वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केली. तर आरटीओच्या माध्यमातून लोड चेकिंगही केले जाणार आहे. अवजड माल वाहतूक करणाऱ्या गाड्यांनी वेगमर्यादेचं उल्लंघन केलं, तर त्यांना तात्काळ दंड ठोठावण्याची व्यवस्था करण्याचा मोठा निर्णयही मोहोळांनी जाहीर केला.



**मुरलीधर मोहोळ काय म्हणाले?**

केंद्रीय हवाई उड्डाण वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनीही नवले पुलाजवळील वाढत्या अपघातांचा आढावा घेतला. पत्रकारांशी बोलताना मुरलीधर मोहोळ म्हणाले की, या भागात पीएमपीएल बसच्या दिवसात ३९५ फेऱ्या होतात. तिथे अधिकृत बसथांबा नसल्यामुळे रस्त्यावर लोक थांबून गर्दी होते. त्यामुळे बस स्टॉप बांधावा लागेल.

**अवजड वाहनांबाबत मोठा निर्णय**

मुरलीधर मोहोळ पुढे म्हणाले की, खेड शिवापूर टोलनाक्यावर अवजड वाहनांचा लोड चेक केला जाईल. तो जास्त असेल तर दंडही आकारला जाईल आणि जागेवरच लोड कमी करण्याची व्यवस्था केली जाईल. सहा स्पीडगन लावल्या जातील. अवजड माल वाहतूक करणाऱ्या गाड्यांनी वेगमर्यादेचं उल्लंघन केलं, तर घरी चालान पाठवलं जाईलच, मात्र पुढच्या टोलनाक्यावर तातडीने अडवून दंड केला जाईल, अशी व्यवस्था करावी लागेल.

**महापालिका आयुक्तांच्या बैठकीतील उपाययोजना?**

महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी महापालिकेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय), वाहतूक पोलिस, परिवहन विभाग, महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आदी विभागांतील अधिकाऱ्यांची काल एकत्रित बैठक घेतली. यामध्ये तातडीच्या, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली असून, ही कामे किती काळात करावी, याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नवले पुलाजवळील रस्त्यादरम्यान चेक पोस्ट उभारणे, सूचना फलक, 'स्पीडगन'द्वारे कारवाई, 'रम्ब्लर पेंट' मारणे, 'सर्व्हिस लेन' विकसित करणे, भुयारी मार्ग बांधणे; तसेच जांभूळवाडी ते सुतारवाडी-पाषाण या दरम्यान सहा लेनचा उन्नत मार्ग बांधणे, या उपाययोजनांचा समावेश आहे.

# "पुण्यात राज ठाकरेंचा पारा चढला; नाही तर पद सोडा!' बुथ एजंट शोधण्याची धावपळ सुरू"

**पुणे :** महापालिका निवडणुका जवळ येताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंचा पारा पुण्यात चढला. मतदार याद्यांच्या पडताळणीसाठी 'बुथ लेव्हल एजंट' नेमण्याच्या तयारीची पाहणी करण्यासाठी गेल्या आठवड्यात पुण्यात आलेल्या राज ठाकरेंनी प्रमुख पदाधिकारी आणि शाखाप्रमुखांची तयारी पाहताच बैठक सोडून दिली. जाण्यापूर्वी त्यांनी स्पष्ट सांगितले. "काम करायचे नसेल, तर पद सोडा!" ही टोकाची वक्तव्य अनेक दिवस पदावर बसलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडवणारी ठरली.

राज ठाकरेंची नाराजी दूर करण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांनी मुंबईत जाऊन प्रयत्न केले, पण यश मिळाले नाही. आता पर्याय उरला नाही; प्रत्येक बुथसाठी एजंट नेमणे अनिवार्य ठरले आहे आणि पदाधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे. मतदार याद्यांच्या पडताळणीसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय प्रमुख पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हडपसरसाठी साईनाथ बाबर, वडगाव शेरीसाठी बाबू वागस्कर, कसबासाठी अजय शिंदे, कोथरुडसाठी हेमंत संभूस आणि गणेश सातपुते, शिवाजीनगरसाठी रणजीत शिरोळे, पुणे कॅन्टोन्मेंटसाठी बाळा शेडगे आणि खडकवासला मतदार संघासाठी किशोर शिंदे यांची नेमणूक करण्यात आली आहे. राज ठाकरेंच्या टोकदार इशाऱ्यामुळे आता मनसेच्या पदाधिकारी बुथ एजंट नेमण्यात झपाट्याने पुढे आले आहेत.

भाजपसारख्या पक्षांनी पूर्वीच प्रत्येक बुथमागे २५ पन्नाप्रमुख नेमून ठेवल्यामुळे निवडणूक तयारीत आघाडी मिळवली आहे, तर मनसेला या टोकदार आदेशामुळे उशीर उडवता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# पुण्यात शासकीय जमीन विक्री घोटाळा; २६ जणांविरोधात गुन्हा!"

## दुय्यम निबंधकांसह २६ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा

**पिंपरी :** कोंढव्यातील महार वतनाच्या जमीन घोटाळ्यानंतर आता ताथवडे येथील शासकीय जमिनीसुद्धा चर्चेत आली आहे. पशुसंवर्धन विभागाच्या १५ एकर ३२ गुंठे (६.३२ हेक्टर) शासकीय जमिनीची खरेदी-विक्री झाल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी दुय्यम निबंधकांसह २६ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. अमोल शरद आहेर यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार, जमिनीची विक्री करणारे २३ जण, खरेदी करणारे दोघे आणि दस्त नोंदणी करणारी दुय्यम निबंधक विद्या शंकर बडे-सांगळे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस तपासात समोर आले की, ताथवडे येथील गट नंबर २० मधील सहा हेक्टर ३२ गुंठे जमीन खरेदी-विक्रीसाठी वापरण्यात आली. विक्री करणाऱ्यांनी ही जमीन पूर्वी हेरंब पंढरीनाथ गुपचूप यांच्या मालकीची असल्याचे दाखवले. मात्र, सातबारा उताऱ्यावर आयुक्त पशुसंवर्धन यांचा ताबा असल्यामुळे शासनाच्या परवानगीशिवाय खरेदी-विक्री करण्यास बंदी होती.

या जमिनीचे जुने सातबारा उतारे जोडून ३३ कोटी रुपयांमध्ये खरेदी झाली. खरेदी ९ जानेवारी २०२५ रोजी दापोडी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात झाली, दस्त नोंदणी विद्या शंकर बडे-सांगळे यांनी केली. पशुसंवर्धन विभागाला हे प्रकरण लक्षात आल्यानंतर त्यांनी त्वरित विभागीय आयुक्तांकडे माहिती पोहोचवली आणि पोलिसात धाव घेतली. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाने पोलिसात धाव घेत, दुय्यम निबंधकांसह २६ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. सध्या पोलिस तपास सुरू आहे, आणि नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडे हा व्यवहार रद्द करण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे.

दरम्यान, कोंढवा येथील अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांचे जमीन घोटाळ्यातील मोठे प्रकरण उघडकीस आल्यानंतर अनेक शासकीय यंत्रणा, कार्यालयातील अधिकारी घाबरले असून अशा जमीन खरेदी विक्रीच्या व्यवहारांची कसून चौकशी सुरू केली आहे. अधिकारी जागे झाले असून त्यांच्या जागृ कतेमुळेच हे प्रकारण उघडकीस आले आहे.

### पुण्यात दहशतवादी विरोधी पथकाची छापेमारी

**पुणे :** दिल्ली बॉम्बस्फोटानंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. महत्त्वाच्या शहरांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. अशातच आता पुण्यातील कोंढवा भागात दहशतवाद विरोधी पथकाने छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे.

यावेळी एका व्यक्तीची कसून तपासणी करण्यात येत आहे. या व्यक्तीला अद्याप ताब्यात घेतलेले नाही, मात्र त्याच्या घराची झडती घेण्यात आली आहे. या कारवाईत लॅपटॉप, हार्डडिस्क आणि काही इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस जप्त करण्यात आले आहेत अशा माहितीही समोर आली आहे. दहशतवादी जुबेर हंगरगेकर याच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून ही छापेमारी करण्यात आली आहे. संशयित व्यक्तीकडून जप्त करण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस फॉरेन्सिक लॅबकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# 'अशी घटना पुन्हा होऊ नये'

## रुग्णवाहिका चालक सचिन मोरे यांचे भावोद्गार

**पुणे :** विविध अपघातांत मृत्यू झालेल्यांची वाहतूक यापूर्वी केली आहे. मात्र, या अपघातात मृतांची अवस्था पाहून खूप दुःख झाले, अशी घटना पुन्हा होऊ नये, अशी भावोद्गार रुग्णवाहिका चालक सचिन मोरे याने काढले आहेत.

मुंबई-बेंगळुरु महामार्गावरील नवीन कात्रज बोगद्यापुढे दरी पूल ते नवले पूल दरम्यानच्या उतारावर गुरुवारी सायंकाळी मालवाहू ट्रकने आठ ते दहा वाहनांना ठोकरून एका कारला जोरदार धडक दिली. ही कार फरफटत नेऊन ट्रकने आणखी एका ट्रकला धडक दिली.

या दोन्ही ट्रकच्या मध्ये अडकलेल्या कारचा अक्षरशः चेंदामेंदा होऊन आग लागल्याने स्फोट झाला. या दुर्घटनेत कारमधील प्रवाशांसह एकूण आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिला, एक बाळ आणि चार पुरुषांचा समावेश आहे.

सायंकाळी ५.४० मिनिटांनी अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षात एका व्यक्तीचा फोन आला. त्याने नवले पुलाजवळ दोन ते तीन वाहनांचा अपघात झाला असून, त्यांना आग लागली असल्याचे सांगितले. अग्निशमन दलाकडून तत्काळ सिंहगड रोड अग्निशमन केंद्राची गाडी घटनास्थळाकडे सोडण्यात आली. गाड्या घटनास्थळी पोहोचल्यानंतर एक कारमध्ये व्यक्ती अकडल्याचे समजले आणि धावाधाव उडाली. सर्वच यंत्रणा कामाला लागल्या.

अग्निशमन नियंत्रण कक्षातून सिंहगड रोड केंद्राची पहिली गाडी पाठवली होती. ती साधारण ५.४८ वाजता घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर एका मिनिटात नवले आणि 'पीएमआरडीए' अग्निशमन दलाच्या दोन गाड्या दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रथम पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला.

### 'सखी आंगण' निर्मितीतून दहा लाखांची उलाढाल अपेक्षित

**पिंपरी :** महापालिकेने आकुर्डीत उभारलेल्या खाद्यपदार्थ केंद्रातील ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटपासाठी ई-लिलाव घेतला. या केंद्राला 'सखी आंगण' नाव दिले असून, त्याचे प्रतीकचिन्ह (लोगो) निश्चित केले आहे. या केंद्राचे संचालन शहरातील महिला बचत गटांमार्फत केले जाणार आहे. महिला बचत गटांमार्फत खाद्यपदार्थ, हस्तकला आणि वस्त्रनिर्मिती व्यवसायाच्या विक्रीतून दरमहा दहा लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित असल्याचे समाजविकास विभागाने सांगितले.

समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात खाद्यपदार्थ विक्री केंद्रे उभारण्यात आली आहेत. या आधुनिक इमारतीतील सर्व ४९ गाळे महिला बचत गटांना खाद्यपदार्थ विक्री व व्यवसायासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी भाडेकराराने ई-लिलावाद्वारे गाळे दिले जाणार आहेत.

# मद्याच्या नशेत दुकानदारांना धमकावणारे पोलीस निलंबित

## 'कॉप्स २४' पथकातील पोलिसांचा प्रताप

**पुणे :** शहरातील गंभीर गुन्ह्यांवर लक्ष ठेवण्यासाठी तयार केलेल्या 'कॉप्स २४' पथकातील पोलिसांनी दुकानदारांना धमकावल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर चौघांना निलंबित करण्यात आले. योगेश माळी, मुकेश वाळले, शंकर धोत्रे, कैलास फुपाटे अशी निलंबित करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी सांगितले की, मद्याच्या नशेत चौघांनी दुकानदारांना हाक दिली, "आम्ही पोलीस आहोत. आमचे कोणी वाकडे करू शकत नाही. आमच्याकडे पैसे मागितले, तर तुम्हाला व्यवसाय करुन देणार नाही". या प्रकारामुळे दुकानदारांनी तात्काळ तक्रार केली. दरम्यान, दुसऱ्या दिवशी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौघांची विचारणा झाली, पण समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे पोलीस उपनिरीक्षक अनिल पाडेकर यांनी त्यांची नोंद स्टेशन डायरीत केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगेश हांडे यांनी अहवाल पाठविल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी चौकशी सुरू केली.

चौकशीत त्यांच्या गैरवर्तनाची पुष्टी झाली. तसेच, यापूर्वीही नेमून दिलेले काम न करणे, हजेरीस उपस्थित न राहणे अशा प्रकारचे गैरवर्तन त्यांनी केले होते. यामुळे चारही पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले गेले. 'कॉप्स २४' हे पथक गुन्हे शाखेच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे. यापूर्वी हडपसर भागातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांनाही अशाच कारणांमुळे निलंबित केले गेले होते.

# ...हीच मुंबईच्या गुन्हेगारीस वेसण घालण्याची त्रिसुत्री

## असे का म्हणाले ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर

**पुणे :** कायद्याची व्यूहरचना, धडाडीचे नेतृत्व आणि राजकीय इच्छाशक्ती अशा त्रिसुत्रीच्या बळावर मुंबईच्या गुन्हेगारीस वेसण घालण्यात मुंबई पोलिसांना यश मिळाले, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

ध्यास फाउंडेशनच्यावतीने निवृत्त पोलीस महासंचालक डी. शिवानंदनलिखित 'द ब्रह्मास्त्र अनलीश्ड' या पुस्तकाचे प्रकाशन निवृत्त पोलीस महासंचालक ए. व्ही. कृष्णन् आणि डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. माधव सानप आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह वि. दा. पिंगळे उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, 'सर्वांना काम देणारी आणि देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही गुन्हेगारीची राजधानी झाली होती. सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले होते. सधन कुटुंबातील व्यक्ती आपल्या घरातील लग्नकार्य, वाहन आणि गृह खरेदी देखील मनमोकळेपणाने करू शकत नव्हते, एवढी दहशतीची पकड गुन्हेगारांनी मजबूत केली होती.

टोकियो, यासुका, कोलंबिया, न्यूयॉर्क अशा जागतिक पटलावर नव्वदच्या दशकातील गुन्हेगारी जगताचे अवकाश पाहिले असता माफीयांनी धुडगूस घातला होता. मात्र, धाडसी, धैर्यशील आणि कणखर नेतृत्वानेच कायद्याच्या चौकटीत राहून या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या,' असे त्यांनी सांगितले.

> विदा (डेटा), कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या सहज उपलब्धतेमुळे आज गुन्हेगारीचे रंगरूप बदलले आहे. त्यामुळे या नवीन शस्त्रांचा सामना करण्यासाठी पोलिसांना सज्ज रहावे लागणार आहे.
>
> – **डॉ. रघुनाथ माशेलकर,** ज्येष्ठ शास्त्रज्ञ

कृष्णन् म्हणाले, 'मुंबईतील गुन्हेगारी ही केवळ एन्काऊंटरने संपण्यासारखी नव्हती. तर, त्यासाठी कायद्याची जरब आवश्यक होती. मकोका कायद्याच्या अंमलबजावणीमुळे मुंबईतील गुन्हेगारीची पाळेमुळे पोलिसांनी खणून काढली,' असे त्यांनी स्पष्ट केले.

डी. शिवानंदन म्हणाले, '९० च्या काळात मुंबईत दाऊद इब्राहिम, छोटा शकील, छोटा राजन यासारख्या गुन्हेगारांनी दहशतवादी हल्ले, खंडणी, खूनांचे सत्र याद्वारे दहशत निर्माण केली होती. एके-४७ सारख्या अत्याधुनिक शस्त्रांद्वारे मुंबई अस्थिर करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना पोलिसांनी कायद्याच्या चौकटीची वेसण घातली,' असे त्यांनी नमूद केले.

पिंगळे यांनी आपल्या मनोगतामध्ये पुस्तकाचे अंतरंग उलगडले. 'गुन्हेगारीमुळे केवळ मुंबईचा विकासच खुंटला नव्हता तर, विविध विचारधारांना सामवून घेणाऱ्या राजधानीची शांतता भंग पावली होती.

धास्तावलेल्या मुंबईकरांना डी. शिवानंधन यांच्यासारख्या धाडसी आणि करारी पोलीस अधिकाऱ्यांमुळे मोकळा श्वास घेता आला आणि सुरक्षित वाटू लागले' असे पिंगळे यांनी सांगितले.

सानप यांनी प्रास्ताविक केले. स्मिता रंधवे यांनी सूत्रसंचालन केले. अक्षता कुलकर्णी यांनी आभार मानले.

# पुण्यात रिंग रोडच्या कामाला गती!

## ११७ गावांचे सर्वेक्षण पूर्ण ; विकास आराखडा सादर होणार

**पुणे:** पुण्याच्या प्रस्तावित वर्तुळाकार मार्गाच्या (रिंग रोड) भोवतालच्या ११७ गावांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी या गावांचे सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, येत्या दोन वर्षांत या गावांचा विकास आराखडा (डीपी) राज्य सरकारला सादर करण्यात येणार आहे.

या गावांमध्ये शिक्षणसंस्था, गृहप्रकल्प (टाउनशिप) यांसह ट्रक टर्मिनल, लॉजिस्टिक पार्क, ट्रॉमा केअर यांसारख्या विविध घटकांशी संबंधित सुविधांची निर्मिती केली जाणार आहे. पुण्याच्या रिंगरोडचे काम सुरू झाल्यानंतर 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'च्या हद्दीतील हवेली, मुळशी, भोर, वेल्हे आणि पुरंदर या पाच तालुक्यांतील ११७ गावांच्या नियोजनाची जबाबदारी



'राज्य रस्ते विकास महामंडळा'कडे (एमएसआरडीसी) दिली होती.

या सर्व गावांचे क्षेत्र सुमारे ६६८ चौरस किमी आहे. या सर्व गावांसाठी विकास आराखडा तयार करण्याचा आदेश सरकारने 'एमएसआरडीसी'ला दिल्यानंतर सर्व गावांतील सर्वेक्षण नुकतेच पूर्ण झाले. या सर्वेक्षणानंतर झालेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या बैठकीत या गावांच्या विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# नवस पूर्ण करून निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला

## एकाच कुटुंबातील तिघांसह चिमुकलीचाही मृत्यू

**पुणे :** वडिलांची प्रकृती बरी व्हावी म्हणून स्वाती नवलकर यांनी नवस केला होता. नवस पूर्ण करण्यासाठी त्या आई, वडिलांसह केतकावळे येथे गेल्या होत्या. त्यांच्यासोबत तीन वर्षीय मोक्षिता रेड्डी हीदेखील गेली होती. गुरुवारी स्वाती नवलकर यांच्या किशोरवयीन मुलीचा वाढदिवस होता. मुलीचा वाढदिवस साजरा करण्याची तयारी कुटुंबाने केली होती. आई घरी आल्यावर वाढदिवस साजरा होणार होता. मात्र, अपघातामुळे या मुलीने आई, आजोबा आणि आजीला गमावले.



नवले पुलाजवळ गुरुवारी झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील विवाहित मुलगी, वडील आणि आईचा मृत्यू झाला. दोन ट्रकच्या मधोमध अडकलेल्या कारमधील या पाच जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला, तेव्हा त्यांची स्वप्नंही बेचिराख झाली.

ट्रकने मागून धडक दिल्यानंतर कार दोन ट्रकच्या मधोमध अडकली. या अपघातामुळे वाहनांनी पेट घेतला. ही धडक आणि आगीची तीव्रता इतकी होती, की कारमधील पाच जणांना बाहेर पडता आले नाही. या अपघातात कार चालक धनंजय कोळी (वय ३०, रा. चिखली, पिंपरी-चिंचवड, मूळ रा. जयसिंगपूर, कोल्हापूर), स्वाती संतोष नवलकर (३७), स्वाती यांचे वडील दत्तात्रय दाभाडे (५८), आई शांता दाभाडे (५४, सर्व रा. धायरी) आणि मोक्षिता रेड्डी (तीन वर्षे, रा, चिखली) या पाच जणांचा मृत्यू झाला. धनंजय कोळी आणि नवलकर- दाभाडे कुटुंबीय ओळखीचे होते. हे सर्व केतकावळे येथे बालाजीच्या दर्शनासाठी गेले होते. मात्र, परतीच्या प्रवासात त्यांचा करूण अंतझाला.

मोक्षिता रेड्डी हिचे वडील हेमकुमार रेड्डी या अपघातातून सावरलेले नाहीत. 'स्वाती बहीण होती. आमच्या कुटुंबाचे जवळचे नाते होते. स्वाती आणि तिच्या आई-वडिलांबरोबर माझी तीन वर्षांची मुलगी बालाजीच्या दर्शनासाठी गेली होती. धनंजय कोळी हे नवलकर यांच्या परिचयाचे होते. या अपघातात तीन वर्षांच्या मुलीच्या मृत्यूने सर्वस्व गमावले आहे,' अशा शब्दांत रेड्डी यांनी अश्रूंना वाट करून दिली.

# दोन नव्हे चार जण कटात सहभागी

## मृतदेहाच्या पायावरून गाडी घालून आरोपी पसार

**पुणे :** पिंपरीमध्ये दोन दिवसांपूर्वी नितीन गिलबिले यांची वडमुखवाडी-अलंकापुरम रस्त्यावर फॉर्च्युनर गाडीत हत्या करण्यात आली होती. कारमध्ये तिघांमध्ये चर्चा झाली, मात्र वाद वाढल्याने अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांनी पिस्तुलातून नितीन गिलबिलेवर गोळ्या झाडल्या. त्यानंतर त्याचा मृतदेह गाडीतून फेकून देण्यात आला आणि त्याच्या पायावरून गाडी घालून दोघेही पसार झाले होते. या प्रकरणात आता धक्कादायक माहिती समोर आली असून, एकूण चार जणांचा या हत्येच्या कटात सहभाग असल्याचं पोलीस तपासात उघड झालं आहे.

अमित पठारे, विक्रांत ठाकूर, सुमित पटेल आणि आकाश पठारे अशी आरोपींची नावे असून यातील अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांना न्यायालयात हजर केलं असता न्यायालयाने त्यांना दि. २१ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. इतर दोन आरोपींना आज न्यायालयासमोर हजर केलं जाणार आहे. पिंपरी चिंचवडचे पोलीस उपायुक्त मारुती जगताप यांनी पत्रकार परिषद घेत नितीन गिलबिले हत्या प्रकरणाविषयी माहिती दिली आहे.

जगताप म्हणाले की, "या हत्या प्रकरणात सुरुवातीला दोन लोकांचा सहभाग आढळून आला होता. पण आता आणखी दोन आरोपी आपल्या हाती लागली असून एकूण चार जणांनी मिळून ही हत्या केली आहे. यातील दोन आरोपी प्रत्यक्ष घटनास्थळी हजर होते, तर इतर दोन आरोपींचा सहभाग नंतरच्या तपासात निष्पन्न झाला आहे. नितीन गिलबिले यांची हत्या करण्यासाठी जे शस्त्र वापरण्यात आलं होतं, ते अद्याप आपल्या हाती लागलेलं नाही. आरोपींची चौकशी करून हे शस्त्र शोधण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. प्राथमिकदृष्ट्या आर्थिक व्यवहाराच्या वादातून हा खून झाल्याचं कळत आहे. पण हा वाद नेमका काय होता आणि तो कधीपासून सुरू होता, हे काही दिवसांत स्पष्ट होईल. त्यादृष्टीने आम्ही आरोपींची चौकशी करत आहोत. या हत्येचा कट कधीपासून रचण्यात येत होता, हे तपासाअंती स्पष्ट होणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.